ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख ११ मार्च, १९६२ | अंक ६

बँक ऑफ महाराष्ट्राची

४ टक्के व्याजाची नवीन योजना

## रिकरिंग डिपॉझिट स्कीम


सोपी व अधिक फायद्याची

तुम्हांला शिल्लक टाकणें सोपें जावें व व्याजही भरपूर मिळावें अशी एक योजना महाराष्ट्र बँकेनें तयार केली आहे. **रिकरिंग डिपॉझिट स्कीम**—यां खात्यांत आपण दरमहा रु.१०/-अगर १०च्या पटींत ५०० रुपयापर्यंत कितीहि रक्कम २ वर्षे भरावयाची. दुसऱ्या वर्षाच्या शेवटीं आपल्या खात्यावर ४ टक्के व्याजानें मोठी रक्कम जमा झालेली दिसेल.

दरमहा जी रक्कम आपण ठरवूं तेवढीच नियमितपणें २ वर्षे टाकावयाची. उदा. रु. १०/- महिना रिकरिंग डिपॉझिट खात्यांत टाकले तर २ वर्षांच्या शेवटीं आपणांस रु. २५०/- मिळतील. या बचतीचा उपयोग आपल्याला कितीतरी चांगल्या गोष्टींसाठीं करितां येईल.

तुमचे पैसे कसे वाढतात तें पहा

| मासिक बचत | २४ महिन्यानंतर मिळणारी रक्कम |
|---|---|
| १० | २५० |
| २० | ५०० |
| ३० | ७५० |
| ४० | १,००० |
| ५० | १,२५० |
| ६० | १,५०० |
| १०० | २,५०० |
| २०० | ५,००० |
| ३०० | ७,५०० |
| ४०० | १०,००० |
| ५०० | १२,५०० |


मोफत माहिती पत्रकासाठीं लिहा अगर बँकेच्या शाखेंत येऊन भेटा.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें-२

Pratibha-62- 3

### पुढील वर्षांत महाराष्ट्रांत आणखी दहा गुदामें

पुढील आर्थिक वर्षांत महाराष्ट्र स्टेट वेअरहाउसिंग कॉर्पोरेशन आणखी १० गुदामें उघडणार आहे. सध्यां या कॉर्पोरेशनचीं ४० गुदामें असून चालू आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी आणखी दोन गुदामें सुरू होण्याची अपेक्षा आहे. हीं सर्व गुदामें सुरवातीला भाड्याच्या जागेंत होतीं; परंतु कॉर्पोरेशननें तीं स्वतःच्या जागेंत हलविण्या-करतां नवीन इमारती बांधण्यास सुरवात केली आहे. तदनुसार धुळें व दोंडाइचे (धुळें जिल्हा), अमळनेर (जळगांव जिल्हा) आणि कऱ्हाड (सातारा जिल्हा) या ठिकाणीं नवीन गुदामें बांधून झालीं आहेत. कऱ्हाड येथील नवीन गुदामांत गूळ सांठविण्याचीहि सोय आहे. सध्यां वैजापूर (औरंगाबाद जिल्हा), जळगांव (जळगांव जिल्हा), नंदुरबार (धुळें जिल्हा), बार्शी (सोलापूर जिल्हा) व नांदेड (नांदेड जिल्हा) येथें नवीन गुदामें बांधण्यांत येत आहेत. त्याचप्रमाणें कॉर्पोरेशननें पुणें, अहमदनगर, औरंगाबाद, वर्धा आणि पंढरपूरसुद्धां आणखी १२ ठिकाणीं गुदामें बांधण्यास मंजुरी दिली आहे.

### अमेरिकेचा शोध कोणी लावला ?

श्री. चमनलाल नांवाच्या एका बौद्ध संन्याशानें शोध लावला आहे कीं, अमेरिकेचा शोध कोलंबसापूर्वीहि एका भारतीयानें लावला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें हरिचंद्र ह्या नांवाचा एक भारतीय नागरिक खिस्त शतकापूर्वी ६ व्या शतकांत अमेरिकेंत गेला. त्यानंतर भारतामधून अमेरिकेंत जाणाऱ्या लोकांच्या संख्येंत एकसारखी वाढ होत गेली. सुमारें १३ व्या शतकापर्यंत हें देशांतर चालूं होतें. अमेरिकेंतील अझटेक, माया व इंका ह्या प्राचीन संस्कृतींशीं भारतीय संकृति बऱ्याच बाबतींत जुळती आहे असा प्रत्यय त्यांना अभ्यासानंतर आला आहे. अमेरिकेचा शोध चीननें प्रथम लावला असा दावा चीनतर्फे नुकताच करण्यांत आला आहे.

### आर्थिक नियोजकांना सूचना

गुजरात वीज बोर्डाचे अध्यक्ष श्री. एच. एम. पटेल ह्यांनीं आर्थिक नियोजन करणाऱ्यांना असा इषारा दिला आहे कीं, तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम यशस्वी करावयाचा असेल तर दोन गोष्टी कटाक्षानें केल्या पाहिजेत. किंमतीचें स्थैर्य राखण्यांत आलें पाहिजे ही पहिली गोष्ट. निर्यात व्यापारांत भारताला अनुकूल अशी तफावत राहिली पाहिजे ही दुसरी गोष्ट.

### अग्निबाणाला खाली पाडणारें शस्त्र

रशिअन शास्त्रज्ञांनीं दूर अंतरावरून येणाऱ्या अग्निबाणाचा पाठलाग करून तो नष्ट करणाऱ्या एका शस्त्राचा शोध लावला आहे अशी माहिती रशिआचे संरक्षणमंत्री मार्शल मॅलिनॉव्हस्की ह्यांनीं जाहीर केली आहे. रशिआनें कांहीं महिन्यापूर्वी अणु बॉंबचे जे ओळीनें स्फोट केले त्यामुळें अमेरिकेलाहि ह्या नव्या शस्त्राची थोडी कल्पना आली असावी. अणुशक्तीवर चालणाऱ्या पाणबुड्या रशिआजवळ असतील, ह्यावर अमेरिकन लष्करी गोटांचा विश्वास बसलेला नव्हता.

### दिल्ली प्राणिसंग्रहालयांत नवे प्राणी

दिल्ली येथील प्राणिसंग्रहालयांत अमेरिकेंतच सांपडणाऱ्या कांहीं दुष्प्राप्य प्राण्यांची भर पडणार आहे. हे प्राणी अमेरिकन सरकारनें भारतीय मुलांना भेटीदाखल देण्याचें ठरविलें आहे. ह्या प्राण्यांत 'बिसॉन' जातीचे दोन रेडे, तांबडे कोल्हे, अस्वलें आणि 'पुमा' म्हणून ओळखला जाणारा एका जातीचा सिंह आहे.

टेलिफोन नं. २४८३.

**पुणें सेंट्रल**

**को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,**

लक्ष्मी पथ, पुणें शहर.

**इकडे वेळींच लक्ष द्या.........**

**आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत रहा.**

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | व्याजाचे नवीन दर |
|---|---|
| १ वर्ष ... ... | ४ टक्के |
| २ वर्षें ... ... | ४। टक्के |
| ३ वर्षें ... ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव ... ... | १॥ टक्के |

या खेरीज शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे-दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

बा. ग. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा**

**शेडयूल्ड बँक**

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः-युवरबँक

**—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—**

चालू :-०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :-२ टक्के

**मुदत ठेवी**

१ वर्ष-४ टक्के, २ वर्षें-४·२५ टक्के, ३ वर्षें-४·५० टक्के, ४ वर्षें-४·७५ टक्के, ५ वर्षें-५ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युमिलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

**शाखा विस्तार**

शाखा-१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर-मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ४,३०,००० |
| ठेवी | रु. | २,८७,११,०३० |
| खेळतें भांडवल | रु. | ३,१५,००,००० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., *जनरल मॅनेजर.*

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी. *चेअरमन.*

# अर्थ

बुधवार, ता. ११ मार्च, १९६२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## इंडियन इन्व्हेस्टमेंट सेंटरचें कार्य

परदेशीय भांडवलाला भारतामधील पैसे गुंतविण्याच्या संधीची माहिती करून देण्यासाठी स्थापन करण्यांत आलेल्या इंडियन इन्व्हेस्टमेंट सेंटरचे अध्यक्ष श्री. जी. एल्. मेहता ह्यांचे मद्रास येथें भाषण झालें. ह्या संस्थेच्या कार्याची माहिती करून घेण्यासाठी मद्रास राज्यांतील बरेच उद्योगपती भाषण ऐकण्यास आले होते. श्री. जी. एल. मेहता आपल्या भाषणांत म्हणाले कीं भारतामधील कांहीं कारखान्यांना, परदेशीय कारखान्यांची मदत घेऊन नवीन कारखाने काढावे अगर जुन्या कारखान्यांचा विस्तार करावा असें वाटत असतें. हिंदमधील ५६ कारखान्यांनीं अशा प्रकारच्या योजना सेंटरकडे पाठविल्या होत्या. त्यांची तपासणी करून सेंटरतर्फे त्या परदेशांत पाठविण्यांत आल्या. भारतामधील कांहीं कारखान्यांप्रमाणें परदेशांतील कांहीं कारखान्यांनाहि हिंदी कारखान्यांबरोबर संयुक्त भागीदारी करण्याची इच्छा आहे. भांडवल निर्यात करणाऱ्या निरनिराळ्या परदेशांकडून औद्योगिक विकासाच्या ४० योजना सेंटरकडे आलेल्या आहेत. ह्यापैकी कांहीं विकास योजनांसंबंधीच्या वाटाघाटी बऱ्याच प्रगत झालेल्या आहेत; कांहीं विकासयोजना तर आपलें कार्यहि करूं लागल्या आहेत. येत्या दोन अगर तीन महिन्यांत आणखी कांहीं विकास कार्यक्रम मार्गक्रमण करूं लागणार आहेत. सेंटरची स्थापना झाल्यापासून परदेशीय व हिंदी भांडवलाच्या संयुक्त कंपन्या काढण्यासाठी सुमारें १,१०० विचारणा आल्या. ह्यांत भारतीय व परदेशीय विचारणांचा समावेश आहे. भारतांत भांडवल गुंतविण्यास कितपत वाव आहे ह्यासंबंधीं परदेशांत फारशी माहिती मिळत नाहीं. परंतु आतां सेंटरच्या प्रयत्नानें व वॉशिंग्टन येथील आर्थिक कमिशनच्या प्रयत्नानें ही परिस्थिति हळूहळू पालटत चालली आहे.

---

## ओरिसा राज्यांतील दारुबंदीची व्याप्ति

भारतामधील कांहीं घटक राज्यांत दारूबंदीचें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. दारुबंदीच्या धोरणाचा फेर-विचार करण्यांत यावा, अशा प्रकारची मागणी दारुबंदी असलेल्या राज्यांतील कांहीं लोक करीत असतात. त्यांच्या मतानें दारुबंदीचा कार्यक्रम पूर्णपणें अयशस्वी झाला असल्यामुळें संबंधित सरकारांनीं तो रद्द करावा आणि दारुवरील अबकारी कराचें उत्पन्न मिळवावें. ओरिसा सरकारनें दारुबंदीच्या कार्यक्रमाची पहाणी करण्यासाठी एक कमिटी नेमली होती. कमिटीनें अशी शिफारस केली आहे कीं, १ एप्रिल, १९६६ पासून ओरिसा राज्याच्या सर्व भागांत संपूर्ण दारुबंदी करण्यांत यावी. पण ओरिसा सरकार ही शिफारस अंमलांत आणील किंवा नाहीं याची शंका वाटत आहे. ओरिसा सरकारनें दारूच्या व्यसनापासून लोकांना परावृत्त करण्यासाठी कांहीं उपाय योजलेले आहेत; परंतु ह्या उपायांना फारसें यश आलेलें नाहीं असें म्हणतात. कमिशननें केलेली शिफारस अंमलांत आणण्याचें सरकारनें ठरविलें तरी त्यामुळें होणारी उत्पन्नांतील घट कशी भरून काढावी हा प्रश्न उपस्थित होणार आहे. म्हणून कमिटीनें असें सुचविलें आहे कीं, राज्यांत संपूर्ण दारुबंदी करण्यांत आल्यास राज्य सरकारच्या उत्पन्नांत जी घट येईल ती भारत सरकारनें भरून काढावी. ओरिसा सरकारचें दारूवरील अबकारीकराचें उत्पन्न गेल्या वर्षीं ५० लाख रुपयांनीं वाढल्याचें दिसून आलें आहे. ह्या वर्षीं हें उत्पन्न २ कोटी रुपयांच्या घरांत जाईल असा अंदाज आहे. एवढें मोठें उत्पन्न गमावण्याची कल्पना ओरिसाच्या सरकारला गैरसोईची वाटावी ह्यांत नवल नाहीं. ओरिसा राज्य मागासलेलें असल्यानें सरकार त्याच्या विकासासाठी उत्पनाचे नवे मार्ग शोधण्याच्या खटपटींत असतें.

---

## आधुनिक शेतीसाठी जपानची मदत

जपानचे भारतामधील वकील मि. मत्सुदारा ह्यांनीं भारताची शेतीची पद्धत आधुनिक करण्याची जरूरी प्रतिपादन केली आहे. महाराष्ट्र राज्याचा सहा दिवसांचा दौरा करण्यासाठी ते मुंबईला आले होते. त्या वेळीं त्यांनीं पत्रकारांना मुलाखत दिली. ते म्हणाले कीं, भारतानें आपलें शेतीचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. ग्रामीण भागांतील जनतेची खरेदीची शक्ति वाढविण्याचा हाच एक उपाय आहे. भाताची लागवड करण्याच्या शास्त्रीय पद्धतींत जपानचा अनुक्रम आज जगांत पहिला लागतो. भाताच्या लागवडीचें हें तंत्र हिंदी शेतकऱ्यानें आत्मसात केलें तर भारतामधील भाताचें उत्पादन सहा पटीनें वाढेल ह्याविषयीं शंका घेण्याचें कारण नाहीं. अलीकडे आशिआंतील देश शेतीपेक्षा उद्योगधंद्यांवर अधिक लक्ष केंद्रित करीत आहेत. त्यामुळें त्यांच्यापुढें नवे प्रश्न निर्माण होत आहेत. बऱ्याच वर्षांपूर्वीं जपानपुढें जे प्रश्न निर्माण झाले होते तेच प्रश्न आज भारतांत पुन्हां निर्माण झालेले आहेत. ग्रामीण भागांतील लोकांची खरेदीची शक्ति वाढविण्याचें महत्त्व पूर्वेकडील देशांत प्रथम जपाननेंच ओळखलें आणि हें साध्य करण्यासाठी शेतीच्या विकासाचा कार्यक्रम हातीं घेतला. भारताची आर्थिक भरभराट व्हावी अशी जपानची मनापासून इच्छा आहे. शेती करण्याच्या जपानच्या पद्धती भारतामधील शेतकऱ्यांना शिकविण्यासाठी लवकरच चार प्रायोगिक केंद्रांची स्थापना करण्यांत येणार आहे. ह्या केंद्रांसाठी जपान भारताला पुरेशी मदतहि देणार आहे.

---

## पानशेत धरणफुटीच्या चौकशीचा खर्च

पानशेत व खडकवासला धरणें फुटल्याच्या कारणांची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या नाईक कमिशनपुढें ४५० साक्षिदारांच्या साक्षी व्हावयाच्या आहेत. फेब्रुवारी ६ तारखेपासून मार्च ६ पर्यंत अवघ्या ५ जणांच्या साक्षी पूर्ण झाल्या आहेत. असाच विलंब लागल्यास साक्षी पुरे होण्यास वर्षापेक्षाहि अधिक अवधी लागेल. म्हणून साक्षी घेण्याच्या पद्धतींत बदल करण्यांत आला आहे. कमिशनच्या कामकाजाचा दरमहा खर्च ६० हजार रुपयांचा आहे.

## बँक गुंडाळण्याला सांगण्याचा रिझर्व्ह बँकेचा अधिकार

### पलाई बँक प्रकरणीं सुप्रीम कोर्टाचा निवाडा

४ ऑगस्ट, १९६० रोजीं रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें केरळ हायकोर्टात बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या ३८ व्या कलमाखाली अर्ज करून पलाई सेंट्रल बँक लि. गुंडाळण्यांत यावी अशी मागणी केली. ५ डिसेंबर, १९६० रोजीं हायकोर्टानें अर्ज मंजूर केला, त्याविरुद्ध सुप्रीम कोर्टाकडे अपील करण्यांत आलें. त्यानंतर, घटना कायद्याच्या ३२ व्या कलमाखाली रिट पिटिशन दाखल करण्यांत आली. सुप्रीम कोर्टानें तीन विरुद्ध दोन अशा बहुमतानें हें अपील आणि रिट पिटिशन हीं दोन्हीं फेटाळून लावलीं.

बँकिंग कंपन्यांच्या कायद्याचीं ३८ ( १ ) आणि ३ ( ब ) ( iii ) हीं कलमें हीं घटनेच्या १४ आणि १९ ह्या कलमांशीं विसंगत नसल्यानें तीं रद्द ठरवितां येणार नाहींत, असा सुप्रीम कोर्टाचा अभिप्राय आहे. रिझर्व्ह बँकेनें तसा अर्ज केल्यास हायकोर्टानें बँकिंग कंपनी गुंडाळण्याचा हुकूम केलाच पाहिजे, असें ३८ ( १ ) हें कलम सांगतें. एखाद्या बँकिंग कंपनीचा कारभार ठेवीदारांच्या हितास बाधक आहे असें रिझर्व्ह बँकेचें मत झाल्यास ती हायकोर्टाकडे त्या बँकिंग कंपनीच्या गुंडाळणीसाठी कलम ३ (ब) ( iii ) खालीं अर्ज करूं शकते. कायद्याच्या ह्या तरतुदींमुळें बँकिंग कंपनी ठेवीदारांच्या हितास बाधक असा कारभार करते किंवा काय, हें ठरविण्याचा मक्ता रिझर्व्ह बँकेस मिळालेला आहे; असा अर्ज आल्यास तो मंजूर करणें हायकोर्टावर बंधनकारक आहे.

बँकिंग कंपनी आणि बिगर–बँकिंग कंपनी, ह्यांचे बाबतींत भेदाभेद केला जात आहे, ह्या मुद्याचें न्यायमूर्ति हिदायतुल्ला ह्यांनीं बहुमतवाल्या न्यायाधीशांचे वतीनें खंडन केलें. रिझर्व्ह बँक ही विवेकानें चालणारी संस्था आहे; मध्यवर्ती सरकार तिला जाब विचारूं शकते आणि लोकमताविरुद्ध तिला विनाकारण जाताच येणार नाहीं. रिझर्व्ह बँकेनें दुष्टपणा केला, तर मध्यवर्ती सरकार आणि न्यायकचेऱ्या मधें पडतीलच. म्हणून, १४ व्या कलमाचा भंग होतो असें मानता येत नाहीं.

एखाद्या बँकेवर प्रथम आरोप ठेवायचा आणि नंतर कोर्टाबाहेरच त्याचा निकालहि लावायचा जुलमी अधिकार रिझर्व्ह बँकेला मिळाला आहे, ह्या मुद्याला सुप्रीम कोर्टाचें उत्तर असें, कीं रिझर्व्ह बँकेची मध्यवर्ती बँक म्हणून स्थापनेचा इतिहास, बँकर्स बँक ह्या नात्यानें तिचें स्थान, बँकिंग आणि बँकिंग कंपन्यांवरील तिचें नियंत्रण, चलन पुरविण्याचा तिचा अधिकार, बँकांना लायसेन्स देण्याचा व ते रद्द करण्याचा तिचा अधिकार, इत्यादिवरून असें म्हणतां येईल कीं, डळमळीत, बुडत्या बँकेला गुंडाळण्यांत यावें, हें ठरविण्याचा अधिकार कोर्टापेक्षा रिझर्व्ह बँकेकडेच असणें ठेवीदारांच्या हिताचें आहे. कोर्टांना पुरेसा वेळ दिला, तर तीहि हें काम करूं शकतील. परंतु, दिरंगाई न होतां निर्णय घ्यावयाचा होता. रिझर्व्ह बँकेला बँकांच्या कारभाराची अंतस्थ माहिती आधीपासूनच असते; त्यांच्या हिशेबपत्रकांशीं त्यांचा दैनंदिन परिचय असतो. कोर्टाला तांतडीनें निर्णय घ्यावा लागला, तर तें रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यानेंच वागेल, हें उघड आहे. तांतडीनें निर्णय हवा असल्यास, कोर्टाला रिझर्व्ह बँकेचें मार्गदर्शन आवश्यकच आहे. पण कायद्यानें रिझर्व्ह बँकेच्या मताला हेंच महत्त्व दिलें आहे, तें अप्रस्तुत असल्याबद्दलची जी तक्रार करण्यांत येत आहे, त्या तक्रारीमध्यें कांहींहि अर्थ नाहीं.

रिझर्व्ह बँकेनें आपल्या अधिकाराचा गैरवापर केला, तर त्याबद्दल तक्रार करायला हरकत नाहीं. रिझर्व्ह बँकेच्या कृतीविरुद्ध अपिलाची तरतूद किंवा कोर्टानें त्यानंतर चौकशी करण्याची तरतूद अनावश्यक आहे. मध्यवर्ती सरकारकडे अपील करून कांहीं फायदा नाहीं; कारण मध्यवर्ती सरकारला विचारल्याविना रिझर्व्ह बँक कृति करणार नाहीं. प्रस्तुत पलाई बँक प्रकरणीं मोरेटोरियम, अमलगमेशन किंवा रिकन्स्ट्रक्शन ह्यासारखा कमी कडक उपाय शक्य होता असें वाटत नाहीं.

---

## राष्ट्रीय उत्पन्नांत १९६०–६१ मध्यें ७·१% वाढ

### दरमाणशीं उत्पन्न ४·८% सुधारलें

भारताचें राष्ट्रीय उत्पन्न, १९४८–४९ मधील किंमतीच्या हिशेबानें, १९६०–६१ मध्यें १२,६९० कोटी रु. होते; १९५९–६० मध्यें तें ११,८५० कोटी रु. होते आणि १९५५-५६ मध्यें १०,४८० कोटी रु. होते. ह्या तीन वर्षीं दरमाणशीं वार्षिक उत्पन्न, १९४८–४९ च्या किंमतीच्या हिशेबानें अनुक्रमें २९२·५ रु., २७९·० रु. आणि २६७·८ रु. होते.

१९५९–६० चे मानानें १९६०–६१ सालीं राष्ट्रीय उत्पन्न ८४० कोटी रुपयांनीं वाढलें. ह्यापैकीं ३६० कोटी रुपयांची वाढ शेतीच्या वाढलेल्या उत्पन्नामुळें आणि ४८० कोटी रुपयांची वाढ बिगर-शेतीच्या वाढलेल्या उत्पन्नामुळें झाली. राष्ट्रीय उत्पन्न ७·१% आणि दरमाणशीं उत्पन्न ४·८% वाढलें. सबंध दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालाचा विचार केला, तर राष्ट्रीय उत्पन्न १९५५–५६ चे मानानें २०·२% आणि दरमाणशीं उत्पन्न ८·४% वाढल्याचें आढळतें.

१९४८–४९ मधील किंमतीच्या हिशेबानें तुलना केल्यामुळें, खऱ्या वाढीची कल्पना येईल. वाढत्या महागाईमुळें किंमती वाढत चालल्या आहेत; त्या किंमतीच्या हिशेबानें १९५५–५६ मध्यें ९,९८० कोटी रु., १९५९–६० मध्यें १२,९४० कोटी रु. आणि १९६०–६१ मध्यें १४,२०० कोटी रु. एवढें राष्ट्रीय उत्पन्न भरलें; म्हणजे दरमाणशीं उत्पन्न अनुक्रमें २५५ रु., ३०४ रु. आणि ३२७ रु. झालें.

---

### रशियांतील शेतीचें उत्पादन उद्दिष्टापेक्षा कमी

रशियाचे पंतप्रधान मि. क्रुश्चॉव ह्यांनीं दोनतीन वर्षांपूर्वी सामुदायिक शेतीवरील नियंत्रणें काढून टाकलीं होतीं. नियंत्रणें रद्द केल्यानें शेतीचें उत्पादन वाढेल अशी त्यांची अपेक्षा होती. परंतु ती खरी ठरली नाहीं. रशियाच्या सप्तवार्षिक योजनेप्रमाणें शेतीच्या उत्पादनाचीं जीं उद्दिष्टें ठरविण्यांत आलीं होतीं तीं गांठण्याच्या कामीं रशियाला अपयश आलें आहे, इतकेंच नव्हे तर उद्दिष्टाच्या मागें रशिया बराच रेंगाळत आहे असें आढळून आलें आहे. गेल्या कांहीं वर्षांचा अनुभव असा आहे कीं, शेतकऱ्यांवरील बंधनें रद्द केल्याबरोबर तो सामुदायिक शेतीपेक्षा स्वतःच्या जमिनीच्या तुकड्यावर अधिक मेहनत घेतो. हा अनुभव लक्षांत घेऊनच रशियाच्या पंतप्रधानांनीं सामुदायिक शेतीवर राबण्यासंबंधीचीं नियंत्रणें पुन्हा घालण्याचें ठरविलें आहे·

---

### पेण को. अर्बन बँकेचा वास्तुशांति समारंभ

दि पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पेण च्या नव्या इमारतीचा वास्तुशांति समारंभ शुक्रवार, दिनांक १६ मार्च, १९६२ रोजीं सकाळीं ७–४२ वाजतां साजरा करण्यांत आला.

# विविध माहिती

**छोट्या उद्योगधंद्यांसाठी कॉर्पोरेशन**—महाराष्ट्र सरकार छोट्या उद्योगधंद्यांचा विकास करण्यासाठी एका कॉर्पोरेशनची स्थापना करणार आहे. छोट्या उद्योगधंद्यांत तयार झालेल्या मालाची विक्री करण्यासहि कॉर्पोरेशन साह्य करणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कॉर्पोरेशनसाठी ४० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

**स्त्रियांच्या पोषाखांचें प्रदर्शन**—बडोदा विद्यापीठाच्या गृहशास्त्र शाखेच्या डीन कु. सिंग ह्यांनीं स्त्रियांच्या पोषाखांचें एक प्रदर्शन भरविलें होतें. प्रदर्शनांत हिंदमधील निरनिराळ्या भागांत तयार झालेल्या १०० प्रकारच्या साड्या होत्या. निरनिराळ्या हवामानांत स्त्रियांना उपयुक्त ठरणारे पोषाख घालून दाखविण्यांत आले.

**साखर कामगारांना नवी वेतनश्रेणी**—महाराष्ट्र शुगर मिल्स ह्या साखर कारखान्याच्या शेतीवर काम करणाऱ्या कामगारांना वेतन-मंडळाच्या शिफारशीप्रमाणें वेतन देण्यांत येणार आहे. ह्यासंबंधीं कामगार संघटना आणि कारखान्याचे चालक ह्यांच्यांत करारहि झाला आहे. कारखान्याच्या शेतीवर ३,००० कामगार काम करतात. आतां अकुशल कामगाराला सुद्धां दरमहा ८७ रुपये पगार मिळूं लागेल.

**पोस्टखात्याचें शिक्षणकेंद्र**—पश्चिम भारतासाठी काढण्यांत येणाऱ्या पोस्ट खात्याच्या शिक्षणकेंद्रासाठी मध्यवर्ती सरकारच्या दळणवळण खात्यानें बडोदा शहराची निवड केली आहे. ह्या केंद्रांत दरसाल १०० उमेदवारांना पोस्ट व टेलिग्राफमधील कामाचें शिक्षण देण्यांत येईल. भारताच्या इतर भागासाठीहि अशीं केंद्रें काढण्याचा सरकारचा विचार आहे.

**कारखान्यासाठी जमिनी देण्यास विरोध**—बडोद्याजवळ काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्यासाठी लागणारी जमीन ताब्यांत घेण्याच्या कामांत अडचणी निर्माण झाल्या आहेत. परंतु ह्या जमिनी सुपीक असल्यामुळें त्या देण्यास शेतकऱ्यांचा विरोध होत आहे. ह्या खेड्यांतील शेतकऱ्यांनीं सार्वत्रिक निवडणुकींत भाग घेतला नव्हता.

**राजमाता जिजाबाईचें स्मारक**—शिवछत्रपतींच्या मातोश्री जिजाबाई ह्यांचें स्मारक सिंदखेड-राजा येथें उभारण्यांत येणार आहे. ह्या ठिकाणीं प्रथम एक सांस्कृतिक व शिक्षणकेंद्र स्थापन करण्यांत येईल आणि नंतर त्याचें रूपांतर स्त्रियांच्या ग्रामीण विद्यापीठांत करण्यांत येईल. स्मारकाची योजना २५ लाखांची आहे. स्मारकाच्या योजनेंत जिजाबाईंचा पुतळा उभारण्याचा समावेश आहे.

**तोंडांतील ब्रशानें चित्रें**—मि. एरिक स्टेगमन ह्या नांवाचे एक चित्रकार नुकतेंच मुंबईत येऊन गेले. ते तोंडांत ब्रश धरून चित्रें काढतात. मुंबई येथें त्यांनीं १० मिनिटांत एका माणसाची चित्ररेखा काढून दाखविली. चित्रकार ३ वर्षांचे असतांना त्यांना पोलिओ रोगानें पछाडलें आणि तेव्हांपासून त्यांचे हात निकामी झाले. १५ वर्षांचे झाल्यावर त्यांनीं तोंडांत ब्रश धरून चित्रें काढण्यास प्रारंभ केला. तोंडानें व पायानें चित्रें काढणाऱ्या कलाकारांची एक संघटना त्यांनीं स्थापन केलेली आहे. सध्यां ते जगाच्या दौऱ्यावर असून अशा अपंग कलाकारांच्या चित्रकृतींचें प्रदर्शन ते ठिकठिकाणीं भरविणार आहेत. त्यांच्या स्वतःच्या कलाकृतींना अनेक आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांत बक्षिसें मिळालेलीं आहेत.

**पं. नेहरूंचा जीवनपट**—पंतप्रधान पं. नेहरूंच्या जीवनपटावर आधारलेला एक कार्यक्रम बी. बी. स्या दूरचित्रवाणीवर दाखविण्यांत आला. जीवनपटांत पं. नेहरूंच्या विद्यार्थी दशेपासून ते थेट ते पंतप्रधान होईपर्यंतच्या कालांतील अनेक प्रसंग दाखविण्यांत आले. कार्यक्रम ४५ मिनिटांचा होता व त्यांत पूर्वी ब्रिटनमध्यें न दाखविण्यांत आलेले प्रासंगिक चित्रपट होते.

**नव्या रेल्वेमार्गाचें उद्घाटन**—ईशान्य रेल्वेवरील बरौनी-समस्तीपूर रेल्वेमार्गाचें उद्घाटन भारताचे रेल्वेमंत्री श्री. जगजीवनराम ह्यांनीं केलें. हा रेल्वेमार्ग ३१ मैल लांबीचा असून तो बांधण्यासाठी १·८७ कोटी रुपये खर्च आला. रेल्वेमार्गाचें काम पूर्ण होण्यास २ वर्षें लागलीं. मार्ग रुंद रुळाचा आहे. उत्तर बिहारच्या औद्योगिक विकासाच्या कामांत ह्या नव्या मार्गाची मोलाची मदत होईल असा अंदाज आहे.

**मुंबईमधील मोटारींच्या संख्येंत वाढ** — मुंबईमधील मोटारींच्या संख्येंत गेल्या पांच वर्षांत तिप्पट वाढ झाली आहे. मोटारींची संख्या ३५ हजारांवरून ९२,००० पर्यंत गेली आहे. मात्र त्या मानानें मोटारी सुस्थितींत ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी वाढलेल्या नाहींत. त्याचप्रमाणें मोटारींची दुरुस्ती चांगली करणारे कामगारहि फारसे वाढलेले नाहींत. त्यामुळें मोटारींची आयुमर्यादा कमी होत चालल्याची तक्रार आहे.

**नर्मदा नदीच्या खोऱ्याचा विकास**—मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र व राजस्थान ह्या राज्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक बैठक नवी दिल्ली येथें भरविण्यांत आली होती. नर्मदा नदीच्या पाण्याचा उपयोग करून घेण्यासाठी एखादी मध्यवर्ती संघटना स्थापन करण्यांत यावी अशी सूचना परिषदेंत करण्यांत आली. नर्मदेच्या खोऱ्यांतील पाणीपुरवठ्याच्या व वीजनिर्मितीच्या योजना संघटनेकडे सोंपविण्यांत याव्या, असेंहि सुचविण्यांत आलें.

**अशोकस्तंभाचा शोध**—नेपाळमध्यें उत्खनन करीत असलेल्या भारतीय पुराणवस्तुशास्त्रज्ञांना एक प्राचीन अशोकस्तंभ सापडला आहे. हा स्तंभ २,००० वर्षांपूर्वीचा असून ज्या ठिकाणीं बुद्धाचा जन्म झाला त्या ठिकाणीं तो सम्राट अशोकानें उभारला असावा, असा अंदाज करण्यात आला आहे. लुंबिनीजवळ ह्या स्तंभाचा तुकडा प्रथम आढळून आला. गौतम बुद्धाचा जन्म लुंबिनी ह्या गांवीं झाला असें मानण्यांत येतें.

**पराभूत मुख्य मंत्री शिक्षणसंस्था काढणार** — मध्य प्रदेशाचे मुख्य मंत्री डॉ. काटजू गेल्या सार्वत्रिक निवडणुकींत पराभूत झाले. ते आतां उज्जैन ह्या ठिकाणीं एक आश्रम काढणार आहेत. ह्या आश्रमांत अखिल भारतीय स्वरूपाची एक शिक्षण-संस्था काढण्याचा त्यांचा विचार आहे. ह्या शिक्षणसंस्थेचा विशेष म्हणजे तेथें सर्व आधुनिक विषयांचें शिक्षण संस्कृतमधून देण्यात येणार आहे.

**जपानी तंत्रज्ञांचा सल्ला** — भारतांत असणाऱ्या एकूण यंत्रमागांपैकी एकतृतीयांश यंत्रमाग सुरत शहरांत आहेत. ह्या मागांवर रेयॉनचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर होतें. सुरत शहरांतील ह्या धंद्याची पाहाणी करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी जपानी तज्ज्ञांचें एक मंडळ भारतांत येऊन गेलें. रेयॉनच्या उत्पादकांना तांत्रिक सल्ला देण्यासाठी जपाननें आपले तीन तज्ज्ञ मुंबईला ठेवले आहेत.

## बँकांचे "चार्ज प्लॅन" अयशस्वी

बँकेनें व्यापाऱ्यांशीं व्यवस्था करून आपल्या कार्ड–होल्डरांना उधार मिळण्याची सोय करावी, कार्ड–होल्डरांच्या खरेदीची रक्कम व्यापाऱ्यांना देण्यास बँकेनें स्वतःस बांधून घ्यावें आणि त्याप्रमाणें दरमहा पैसे द्यावे आणि त्याचा मोबदला म्हणून व्यापाऱ्यांनीं बँकेला कार्ड–होल्डरांच्या खरेदीचे रकमेवर कमिशन द्यावें, अशा चार्ज प्लॅनच्या योजना अमेरिकेंत अंमलांत आहेत. ह्या योजनेमुळें, कार्ड–होल्डरांना रोकड बाळगावी लागत नाहीं, दुकानदारांचें येणें बँकेकडून वसूल होतें आणि बँकेला कमिशन मिळतें. न्यूयॉर्कमधील रॉकफेलरच्या नेतृत्वाखालील चेस मॅनहॅटन बँकेनें गिऱ्हाइकांच्या ह्या सेवेला १९५८ मध्यें प्रारंभ केला, परंतु चार वर्षांच्या अनुभवानंतर ही योजना युनि–सर्व्ह कॉर्पोरेशनला गिऱ्हाइकांकडून येणें असलेल्या ९० लक्ष डॉलर्स किंमतीला विकून टाकून ती मोकळी झाली. कॅलिफोर्नियाच्या बँक ऑफ अमेरिकेच्या तत्सम यशस्वी योजनेचा प्रमुख जोसेफ पी. विल्यम्स हा ह्या खरेदीदार कॉर्पोरेशनचा प्रमुख आहे.

गेल्या दहा वर्षांत कित्येक बँकांनीं अशा चार्ज प्लॅन योजना सुरू केल्या, त्यापैकीं बहुतेक अयशस्वी झाल्या. कार्डधारक पुष्कळ असले तरी कार्डावर उधारीनें व्यवहार पुरेसे होत नाहींत, दुकानदार बँकेला कमिशन द्यावें लागूं नये म्हणून कार्डावर उधारी देण्याचें टाळतात. कार्ड–होल्डर बँकेचे थकबाकीदार बनतात, त्यामुळें बँकांचा खर्च भागण्याइतकीहि त्यांना प्राप्ति होत नाहीं, असा अनुभव आहे. बँकांप्रमाणें कांहीं इतर फर्म्सनींहि हा धंदा सुरू केला आहे. १२ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या डायनर्स क्लबच्या पटावर १२ लक्ष कार्ड–होल्डर्स आहेत. त्याचें उत्पन्नहि घटत आहे.

## दाणे आणि खडे

[ लेखक : श्री. श्री. वा. काळे, प्रकाशक : स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, ४१० शनिवार पेठ, पुणें २, पृष्ठें ११२ किंमत रु. २·५० ] जुने आणि नवे आचार व विचार यांचा मनोज्ञ संगम घडविण्याची श्री. काळे यांची तळमळ मराठी वाचकांना परिचित झाली आहे. 'कण आणि क्षण' या पहिल्याच पुस्तकानें वाचकांना त्यांनीं आपलेसें करून सोडले. श्री. काळे ज्या प्रकारचें ललित लिखाण करतात तो प्रकार मराठी साहित्यांत अजूनहि नवें दालन म्हणूनच उल्लेखितां येईल. या वाटेला फारसें कोणी जात नाहीं. जुनी व नवी पिढी यांनीं आपापल्या दृष्टीकोणाची सांगड कशी घालावी, हें श्रीं. काळे यांच्या लिखाणांतून चर्चिलें जातें. जीवन सुसह्य, सुखी व समृद्ध करण्यास आजच्या पिढीला अशा वैचारिक मार्गदर्शनाची गरज आहे. श्री. काळे यांच्या पूर्वीच्या पुस्तकांप्रमाणेंच याहि पुस्तकानें तें कार्य चांगल्या प्रकारें पार पाडलें आहे.

समाजांतील कित्येक रूढी, विचारप्रवाह, ग्रह यांचा ऊहापोह या पुस्तकांत आहे. दिसावयाला क्षुल्लक पण परिणामी गंभीर अशा आचारविचारांचें हळुवार, सहानुभूतिपूर्वक, डोळस व विवेचक शैलीनें केलेलें हें विश्लेषण मौलिक आहे.

## भारत सरकारचा अर्थसंकल्प

( आंकडे कोटी रु. मध्यें )

| | १९६१–६२ चे अर्थसंकल्पीय संकल्प | १९६१–६२ चे दुरुस्त अंदाज | १९६१–६२ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| उत्पन्न | १०१७·९५ | १०७९-११ | १३०५·८७ |
| खर्च | १०२३·५२ | १०४५·१५ | १३६९·३३ |
| | –५·५७ | +३३·९६ | –६३·४६ |

महसुली उत्पन्नांत ६३ कोटी रु. ची तूट येईल असा अंदाज आहे. भांडवली खर्च ५८८ कोटी रु. होईल. राज्य सरकारांना व इतरांना कर्जे देण्याकरितां ६०० कोटी रु. खर्च होतील व कर्जाची परतफेड करण्यासाठी २२७ कोटी रु. खर्च होतील. एकूण १४७८ कोटी रुपयांचा हा विनियोग परदेशांकडून मिळणारें कर्ज ८२० कोटी रु., कर्जाच्या परतफेडींतून २१८ कोटी रु., पी. एल. ४८० मधून ९० कोटी रु. आणि संकीर्ण कर्जे आणि इतर ठेवी वगैरेंतून २०३ कोटी रु. असा भागविण्यांत येणार असून १४७ कोटी रु. ची तूट पडणार आहे.

## भोर स्टेट बँक लि., भोर

१९६१ मध्यें बँकेला ७,७२५ रु. नफा झाला. रिझर्व्ह फंड, इन्कमटॅक्स, बुडित व संशयित कर्जे, ह्यांच्या तरतुदीसाठी त्याचा विनियोग करण्यांत आला. बोर्डानें चालू सालीं भागावरील नफा न वाटण्याचें ठरविलें आहे.


# भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ५१,५०० |

बँक लौकरच स्टेट बँक ऑफ इंडियामध्यें विलीन होणार आहे.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याज–वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१–६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

श्री. गो. बा. देवी — श्री. बा. ग. धंदुके



दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

### रौप्यमहोत्सवी वर्ष

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. ला १९६१ मध्यें ३,२७,३८० रु. नफा झाला. इन्कमटॅक्ससाठी १,५८,००० रु. ची आणि स्टाफला बोनससाठीं २५,००० रु. ची तरतूद करून, ६६,००० रु. स्टॅचुटरी रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करून ९% डिव्हिडंड + ३% बँकेच्या रौप्यमहोत्सव वर्षानिमित्त बोनस देण्यासाठी ७८,००० रुपयांचा विनियोग केला जाईल. बँकेनें अहवालाचे वर्षी मार्केट यार्ड-कोल्हापूर आणि सातारा रोड येथें शाखा उघडल्या. सातारा स्वदेशी कमर्शिअल बँकेच्या विलिनीकरणामुळें युनायटेड वेस्टर्नच्या शाखांचे संख्येंत सहांची भर पडली. अशा रीतीनें बँकेच्या आतां २१ शाखा झाल्या आहेत. ५ एप्रिल, १९६२ रोजीं बँकेला २५ वर्षे पुरीं होत आहेत; एप्रिलच्या मध्याचे सुमारास रौप्यमहोत्सव साजरा केला जाईल. बँकेकडे ३ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत, त्यांपैकी १ रु. ते १,५०० रु. च्या ठेवी असणारे ठेवीदार ८८·३३% आहेत; ८·६१% ठेवीदारांच्या ठेवी १,५०१ रु. ते ५,००० रु. च्या आहेत आणि बाकीच्या ३·०६% ठेवीदारांच्या प्रत्येकी ५,००० रु. वर ठेवी आहेत.

### पूर्व आफ्रिकेंतील दुर्मिळ प्राण्यांचा नाश

पूर्व आफ्रिकेंतील शिकाऱ्यांच्या संघटनेनें सरकारला असा इषारा दिला आहे कीं, पूर्व आफ्रिकेंतील कित्येक दुर्मिळ प्राणी बेकायदा शिकार करण्याच्या प्रवृत्तीमुळें नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. ह्या बाबतींत सरकारनें कांहीं निर्बंध लवकर घातले नाहीं तर हे प्राणी सुमारें तीन वर्षांच्या अवधींत दुर्मिळच नव्हे तर नाहींसे होतील. आजच परिस्थिति अतिशय कठीण झालेली आहे. बेकायदा शिकारी अशाच होत राहिल्या तर १२ महिन्यांचे आंतच त्याचे परिणाम भोगावे लागतील. पूर्व आफ्रिकेंतील दुर्मिळ प्राणी नाहींसे झाल्यास त्याचा परिणाम तेथील अर्थव्यवस्थेवर झाल्याशिवाय राहणार नाहीं.

### होटेलसच्या व वहातुकीच्या धंद्यांना मदत

लोकसभेनें राज्यांच्या फिनॅन्शियल कॉर्पोरेशनचें कर्ज देण्याचे अधिकार वाढविणारें एक बिल मंजूर केलें आहे. नव्या बिला-प्रमाणें ह्या कॉर्पोरेशन्सना होटेलच्या व वहातुकीच्या धंद्यांना कर्जें देतां येतील. शिवाय औद्योगिक वसाहतींच्या विकासालाहि कर्जें देतां येतील. उद्योगधंद्यांना लागणाऱ्या पैशाची मागणी पुरविता यावी म्हणून कॉर्पोरेशन्सचा कर्ज काढण्याच्या अधिकारांची व्याप्तीहि वाढविण्यांत आली आहे. सार्वजनिक भांडवलाच्या कंपन्या व सहकारी संस्था ह्यांना आतां कॉर्पोरेशनतर्फे जास्तींत जास्त २० लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळूं शकेल. बिलाचा पुरस्कार करतांना उपअर्थमंत्री श्री. भगत म्हणाले कीं कॉर्पोरेशनजवळील पैसा वाढविण्याचा आणि छोट्या व मध्यम प्रतीच्या धंद्यांना यावयाच्या कर्जाच्या अटी आणखी सैल करण्याचा सरकार प्रयत्न करील.

**हृषीकेशजवळील औषधाचा कारखाना**—हृषीकेशजवळ निघणाऱ्या औषधी कारखान्यांच्या कचेरीच्या इमारतीच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ झाला. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत रशियाच्या साह्यानें काढण्यांत येणाऱ्या ४ औषधी कारखान्यांपैकीं हा एक आहे. त्याच्या उभारणीसाठीं २४ कोटी रुपये लागतील. उत्पादनास २ वर्षांनंतर प्रारंभ होईल.

### परदेशीय भांडवलाला वाटणारी भीति

इंडियन इन्व्हेस्टमेंट सेंटर या संस्थेचे अध्यक्ष श्री. गगनविहारी मेहता आंध्र चेंबर ऑफ कॉमर्सपुढें बोलतांना म्हणाले कीं, पर-देशांतील भांडवल गुंतविणाऱ्या वर्गाला भारताच्या राजकीय परि-स्थितीच्या स्थैर्याबद्दल कांहीं चिंता वाटत नाहीं. कारण, भारताची स्वतःची राज्यघटना आहे आणि येथील राज्यकारभार लोक-शाहीच्या मार्गानें यशस्वी रीत्या चालविण्यांत येत आहे. आर्थिक जीवनाचें नियोजन करण्यांत येत असल्यामुळें हिंदचा फायदा झाला आहे. देशांतील खाजगी उद्योगधंद्यांची वाढहि होत आहे. उद्योगधंद्यांच्या प्रकारांत विविधता आली असून त्यांचा विस्तारहि होत चाललेला आहे. एका गोष्टीबद्दल मात्र परदेशीय भांडवल-दारांना चिंता वाटते; त्यांपैकीं कांहीं जणांना भारतामधील कर फार आहेत असें वाटतें.

### तेलखाणींच्या प्रदेशांत खताचा कारखाना

गुजरात सरकारच्या मालकीचा एक खताचा कारखाना गुजरात राज्यांतील तेलाच्या भागांत काढण्यांत येणार आहे. ह्या कार-खान्यासाठीं २८ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. कारखान्याची योजना आखण्याचें काम बहुधा फर्टिलायझर्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ह्या कंपनीकडे देण्यांत येईल. कंपनीकडून कारखान्याचा नकाशा तीन ते चार महिन्यांत मिळेल असा अंदाज आहे. बडोदा शहराजवळ काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्याच्या जवळपासच खताचा कारखाना काढण्यांत येणार आहे. गुजरात राज्यांतील खताचा हा पहिलाच मोठा कारखाना होईल, व त्यामुळें राज्यांतील शेतीच्या विकासाला मदत होईल.

### रेल्वेच्या अपघातापायीं मिळणारी नुकसानभरपाई

रेल्वे अपघातांत दगावल्याबद्दल अगर दुखापत झाल्याबद्दल नुकसानभरपाई देण्याबाबत रेल्वे ॲक्टमध्यें दुरुस्ती करण्यांत आली आहे. नवीन कायद्याप्रमाणें रेल्वेच्या अपघातांत एखादा उतारू दगावला अगर त्याला दुखापत झाली तर जास्तींत जास्त २०,००० रुपये नुकसानभरपाई म्हणून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. पूर्वी ही रक्कम जास्तींत जास्त १०,००० रुपये होती. नुकसानभरपाईची मर्यादा ठरवितांना महागाईचा आणि दरमाणशीं वाढलेल्या उत्पन्नाचा विचार करण्यांत आला आहे. त्यांतहि कमी उत्पन्नांतील गटाच्या लोकांना अधिक नुकसानभरपाई मिळण्यासाठीं सोईस्कर असें कोष्टक तयार करण्यांत आलें आहे. रेल्वे रुळांची नासधूस करणारांना किमान शिक्षा देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

**निडणुकींतील आक्षेपार्ह प्रचार**—नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकींत कांहीं पक्षांनीं आपल्या उमेदवारांसाठीं आक्षेपार्ह प्रचार केल्याचें मध्यवर्ती सरकारच्या गृहखात्याला समजलें आहे. ह्या पक्षांनीं छापलेलीं कांहीं भित्ति पत्रकें व प्रचारपत्रकें जमवून गृहखात्याकडे पाठविण्याची सूचना पं. नेहरू ह्यांनीं कॉंग्रेस पक्षाच्या सभासदांना केली आहे.

**अणुवीज केंद्रासाठीं विमानतळ**—तारापोर येथें काढण्यांत यावयाच्या अणुवीजकेंद्रासाठीं जवळच एक विमानतळ बांधण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. विमानतळासाठीं बावडा ह्या सेडेगांवाजवळील मोठी जमीन ताब्यांत घेण्यांत आली आहे. तारापोर येथील वीजनिर्मिती केंद्र ४ मैल लांबीच्या पक्क्या रस्त्यानें विमानतळाला जोडण्यांत येणार आहे.

## रेल्वे खात्याचा १९६०–६१ चा वार्षिक अहवाल

प्रवासी आणि मालवाहतुकीच्या बाबतींत भारतीय रेल्वेचे यापूर्वीचे उच्चांक १९६०–६१ मध्यें मोडले गेले. सन १९६०–६१ मध्यें भारतीय रेल्वेनीं १६१·६ कोटी प्रवाशांची व १५·७ कोटी मेट्रिक टन मालाची वाहतूक केली.

सन १९६०–६१ हें वर्ष दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें अखेरचें वर्ष होतें आणि १९५५–५६ मधील वाहतुकीशीं तुलना करतां या वर्षी प्रवासी वाहतुकींत २५ टक्क्यांनीं वाढ झाली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत अशी १५ टक्क्यांनीं वाढ संकल्पित होती. सन १९५५–५६ पेक्षा १९६०–६१ मध्यें मालवाहतुकींत ३५ टक्क्यांनीं वाढ झाली.

या वर्षांत चालू खर्चाचें एकूण उत्पन्नाशीं प्रमाण ७८·७८ टक्के पडलें. गेल्या ८ वर्षांच्या काळांत हें प्रमाण सर्वांत कमी आहे. खर्चवेंच वजा जातां या वर्षी रेल्वेला ३२·०१ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला.

या वर्षी रेल्वेला प्रवासी वाहतुकीपासून १३१·५९ कोटी रुपये. मालवाहतुकीपासून २८६·१४ कोटी रुपये व पार्सलें, सामान व इतर संकीर्ण वाहतुकीपासून ३९·०७ कोटी रुपये असें एकूण ४५६·८० कोटी रुपये महसुली उत्पन्न मिळालें आणि ३१३·१५ कोटी रुपये खर्च झाले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत रेल्वेसाठी ११०६ कोटी रुपयांची तरतूद होती; प्रत्यक्षांत रेल्वेनीं १०४४ कोटी रुपये खर्च केले.

### १९६२–६३ चा रेल्वे अर्थसंकल्प

( आंकडे कोटी रुपयांत )

| | प्रत्यक्ष आंकडे १९६०–६१ | अर्थसंकल्प १९६१–६२ | दुरुस्त अंदाज १९६१–६२ | अर्थसंकल्प १९६२–६३ |
|---|---|---|---|---|
| वाहतुकीपासून मिळालेलें एकूण उत्पन्न | ४५६·८० | ४९९·०२ | ५०१·२४ | ५२४·१० |
| निव्वळ चालू खर्च | ३१३·२४ | ३३२·६७ | ३३०·५५ | ३४५·७४ |
| निव्वळ संकीर्ण खर्च | १०·६९ | १४·८७ | १३·५१ | १६·३५ |
| महसुली उत्पन्नांतून घसारा निधींत जमा | ४५·०० | ६५·०० | ६५·०० | ६७·०० |
| एकूण | ३६८·९३ | ४१२·५४ | ४०९·०६ | ४२९·०९ |
| रेल्वेचा निव्वळ महसूल | ८७·८७ | ८६·४८ | ९२·१८ | ९५·०१ |
| सर्वसाधारण महसुलांत जमा : (१) रेल्वे भांडवलावरील डिव्हिडंड (१९६० ६१ साठी ४ टक्के दरानें व १९६१-६२ साठी ४·२५ टक्के दरानें) | ५५·८६ | ६५·३४ | ६३·२० | ६९·३५ |
| (२) प्रवासी भाड्यावरील कराऐवजीं | — | १२·५० | १२·५० | १२·५० |
| निव्वळ शिल्लक | ३२·०१ | ८·६४ | १६·४८ | १३·१६ |

## नवीन सहकारी कायद्यामधील जामीनदाराचें स्थान

लेखक:–रणछोड पांडुरंग भोंडे, बी. ए., एलएल. बी., पुणें २.

दि महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीचा कायदा नंबर २४/-१९६१ चा २६ जानेवारी, १९६२ रोजीं अंमलांत आल्याचें जाहीर झालें आहे. सदरच्या कायद्यांत सोसायटीची व्यवस्था या सदराखालीं जे नियम केले आहेत. ते महत्त्वाचे आहेत. त्यामध्यें असें नमूद केलें आहे कीं, कोणीहि सभासद कर्जदार अगर जामीनदार असून सोसायटीचे नियमाप्रमाणें थकबाकीदार (डिफॉल्टर)तीन महिनेपेक्षा जास्त काळ असल्यास त्यास सोसायटीच्या कमिटीच्या ( कार्यकारी मंडळाच्या ) निवडणुकीस उभें राहतां येणार नाहीं. जुन्या कायद्यांत फक्त मूळ कर्जदार हा थकबाकीदार असेल तर त्याला निवडणुकीस उभें राहतां येत नव्हते. आतां नवीन कायद्यानें जामीनदारावरहि बंधन घातलें आहे. त्याचप्रमाणें एखादा सभासद निवडणुकीसाठीं उभे राहण्यास पात्र असेल परंतु निवडून आल्यानंतर सुद्धां जर तो कर्जदार अगर जामीनदार असून वरीलप्रमाणें थकबाकीदार असल्यास त्याचें कार्यकारी मंडळावरील सभासदत्व आपोआप रद्द होईल. शिवाय कार्यकारी मंडळावरील निवडून आलेला सभासद जर तो दुसऱ्या कोणत्याहि सोसायटींत कर्जदार अगर जामीनदार या नात्यानें वरीलप्रमाणें थकबाकीदार असेल तर त्याचें कमिटीवरील सदस्यत्व ताबडतोब रद्द होणार आहे.

वरील नियम ता. २६ जानेवारी १९६२ रोजीं अंमलबजावणींत आल्याचें बहुसंख्य सोसायट्यांच्या सभासदांस माहीत झालें नसावें. कारण या कायद्याखालीं जे नियम केले आहेत त्याच्या प्रती अद्यापहि मिळत नाहींत. सदरचे नियमांची अंमलबजावणी नवीन कायदा अंमलांत येणेचे अगोदर जे सभासद कमिटीवर निवडून आले आहेत त्यांनाहि लागू आहेत किंवा कसें याबाबत मतभेद आहे. तरीसुद्धां या अंमलांत आलेल्या नियमानुसार सोसायटीचे कमिटीनें वरील नियमांची अंमलबजावणी केली जाते याची दक्षता घ्यावयास पाहिजे व त्या अनुरोधानें आपला कारभार करावयास पाहिजे आहे.

---

## नव्या कंपनीच्या स्थापनेची जाहिरात

### कितपत कायदेशीर आहे ?

एखाद्या कंपनीच्या स्थापनेला, तिचेविषयीं किमान तपशील देऊन, प्रसिद्धी देणें कायदेशीर आहे काय ? कंपनी कायद्याच्या ५६ व्या व ६६ व्या कलमांचे तें विरुद्ध आहे, असें कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीखात्याचें मत आहे. कित्येक कंपन्यांचे उत्पादक कंपन्यांच्या स्थापनेची जाहिरात प्रसिद्ध करतात, तिच्या खालीं " हा प्रॉस्पेक्टस नसून केवळ स्थापनेची सूचना आहे. " असें छापण्याची दक्षता घेतात. अशी जाहिरात करणें म्हणजे संक्षिप्त असा प्रॉस्पेक्टस प्रसिद्ध करणेंच होय, असें खात्याचें म्हणणें आहे. कंपनीच्या स्थापनेच्या प्रसिद्धीला ५६ किंवा ६६ ह्या कलमांनीं प्रतिबंध केलेला नाहीं, असें इंडियन मर्चेंटस् चेंबरचें त्याला उत्तर आहे. प्रॉस्पेक्टसला न जोडलेले शेअर अर्ज फॉर्म दिले जातात का, हा खरा महत्त्वाचा मुद्दा आहे. जाहिरातींत जोंवर शेअर घेण्याचें आवाहन केलेलें नसतें, तोंवर कंपनी कायद्याचा भंग होण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं.

---

## विदेशी ( मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील ) फर्म्समधील हिंदी अधिकारी

विदेशी मालकीच्या आणि नियंत्रणाखालील फर्म्सचे भारतामधील व्यवहार वाढत आहेत आणि त्यांच्या अधिकाऱ्यांची संख्याहि वाढणें स्वाभाविक आहे. विदेशी फर्म्समध्यें १९५४ सालीं १,००० रु. किंवा त्यापेक्षा अधिक पगाराचे एकूण अधिकारी १०,४६३ होते, ते १९६१ मध्यें १४,५९३ झाले. त्यांपैकी हिंदी ३,४५५ चे १०,२२९ झाले, तर विदेशीयांची संख्या ७,००८ वरून ४,३६४ वर उतरली. हिंदी अधिकाऱ्यांचें एकूण अधिकाऱ्यांशीं प्रमाण ३३.०% होतें, तें आतां ७०.१% इतकें वाढलें; विदेशीयांचें ६७.०% वरून २९.९% वर उतरलें. तागाच्या गिरण्या, बँका, मळे, इत्यादि कंपन्यांतून हिंदीकरणाची गति मंद आहे. १,००० रु. ते २,००० रु. मिळविणाऱ्या हिंदी अधिकाऱ्यांचें प्रमाण आतां ८८.९% झालें आहे; २,००१ रु. ते ३,००० रु. मिळविणाऱ्या हिंदी अधिकाऱ्यांचें प्रमाण ५८.२% आहे. त्यापेक्षा जास्त पगार असणाऱ्या हिंदी लोकांचें प्रमाण २८.९% आहे. १९६२ अखेर, २,००० रु. खालील सर्व जागांवर हिंदी लोकच असतील आणि २,००१ रु. ते ३,००० रु. गटांतील हिंदी लोकांचें प्रमाण ७०.% होईल अशी अपेक्षा आहे. त्यांपेक्षा जास्त पगाराच्या जागांचें हिंदीकरण मंद गतीनें होईल.

**अधिकारी वर्गाच्या हिंदीकरणाचा तुलनात्मक तक्ता**

| वर्ष | हिंदी | एकूणपैकी हिंदी | विदेशी | एकूणपैकी विदेशी % | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १९५४ | ३,४५५ | ३३.० | ७,००८ | ६७.० | १०.४६३ |
| १९५५ | ४,१३९ | ३७.८ | ६,८१० | ६२.२ | १०,९४९ |
| १९५६ | ४,८६२ | ४२.५ | ६.५६६ | ५७.५ | ११.४२८ |
| १९५७ | ५,९०६ | ४९.५ | ६,०२५ | ५०.५ | ११,९३१ |
| १९५८ | ६,९५९ | ५६.२ | ५,६५२ | ४४.८ | १२,६११ |
| १९५९ | ७,९१६ | ५९.९ | ५,३०४ | ४०.१ | १३.२२० |
| १९६० | ९,११३ | ६५.५ | ४,८०९ | ३४.२ | १३.९९२ |
| १९६१ | १०,२२९ | ७०.१ | ४,३६४ | २९.९ | १४,५९३ |

## परदेशीय प्रवाशांच्या संख्येंत वाढ

भारतांत येणाऱ्या हौशी प्रवाशांच्या संख्येंत दरसाल वाढ होत आहे. १९६१ सालीं आलेल्या परदेशीय प्रवाशांपैकी दक्षिण अमेरिकेकडून आलेल्या प्रवाशांच्या संख्येंत विशेष वाढ झाली आहे. १९५९ सालीं दक्षिण अमेरिका खंडांतून आलेल्यांची संख्या ५५८ होती, ती १९६० सालीं ८१३ व १९६१ सालीं १,४४० इतकी झाली. पूर्व युरोपांतून व अमेरिकेंतून आलेल्या प्रवाशांच्या संख्येंतहि अशीच वाढ झालेली आहे. १९६१ सालच्या पहिल्या ९ महिन्यांत एकूण १ लाख परदेशीय प्रवासी भारतांत आले. त्यांपैकी २४,९९३ प्रवासी अमेरिकेंतील होते. १९५९ सालीं अमेरिकेंतून १५,६७६ प्रवासी आले होते व १९६० सालीं २०,३६१ प्रवासी आले होते.

**खोटीं नाणीं पाडणाऱ्याला मृत्यूची शिक्षा** — खोटीं नाणीं अगर खोट्या नोटा तयार करण्याच्या अपराधाला मृत्यूची शिक्षा देणारा हुकूम गेल्या वर्षी रशियांत जारी करण्यांत आला होता. हा अपराध करणाऱ्या एका गुन्हेगाराला रशियांत नुकतेंच गोळी घालून ठार करण्यांत आलें. गुन्हेगारानें ५० कोपेक्सचीं व एक रुबेलचीं खोटीं नाणीं पाडून तीं प्रसृत केलीं होतीं.

## गुजरातमध्यें उद्योगधंदे काढण्याच्या सूचना

गुजरात राज्याच्या कौन्सिल ऑफ इंडस्ट्रीजची बैठक अहमदाबाद येथें भरली होती. गुजरात राज्यांतील उद्योगधंद्यांच्या वाढीविषयीं संघटनेतर्फे बऱ्याच सूचना करण्यांत आल्या आहेत. त्यांपैकी कांहीं अशा :—गुजरातमधील कांहीं जिल्ह्यांतून सरकीपासून तेल काढण्याचे कारखाने काढण्यांत यावेत. त्याचप्रमाणें सुरत, अहमदाबाद आणि कैरा जिल्ह्यांत भाताच्या कोंडयापासून तेल काढण्याच्या गिरण्या काढण्यांत याव्या. राज्यांतील उसाची लागवड सध्यां ४० हजार एकरापुरतीच मर्यादित आहे. तिची वाढ एक लाख एकरांपर्यंत करण्यांत यावी, आणि राज्यांत साखरेचे १० कारखाने काढण्यांत यावेत. प्रत्येक कारखान्यांत रोज १,००० टन उसाचें गाळित करूं शकणारी यंत्रसामग्री बसविण्यांत यावी. त्याशिवाय डबाबंद फळांचे, गुरांच्या खाद्याचे व लाकूड टिकाऊ करण्याचे कारखानेहि योग्य ठिकाणीं काढण्यांत यावेत. गुजरात राज्यांतील खनिज संपत्तीचा शोध लावण्यासाठी राज्याची भूगर्भविषयक पाहणी करण्यांत यावी. हें काम सरकारनें अगर तें न जमल्यास खाजगी संस्थांकडूनहि करवून घेण्यांत यावें. गुजरात राज्यांत कांचेचे दोन कारखाने काढण्यास परवाने देण्यांत आले आहेत. परंतु आणखी एका कारखान्याची गुजरातला गरज आहे. राज्यांतील उद्योगधंद्यांचा विकास घडवून आणण्यासाठी एंजिनिअरिंगच्या कारखान्यांची वाढ होणें अतिशय अगत्याचें आहे. नव्या उद्योगधंद्यांच्या उभारणींत व ते चालू ठेवण्याच्या कामांत एंजिनिअरिंगच्या कारखान्यांना महत्त्वाची कामगिरी बजावावी लागणार आहे.

## जपानसाठी हिंदी मिठाचा पुरवठा

जपानच्या सोड्याच्या धंद्यासाठी लागणारें मीठ पुरविण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनचें एक प्रतिनिधी मंडळ लवकरच टोकिओला जाणार आहे. उभयतां देशांच्या अटी जमल्यास जपानशीं दीर्घ मुदतीचा पुरवठ्याचा करार होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी भारतानें जपानला थोडेंसुद्धां मीठ पुरविलें नाहीं. कारण, मीठ घेतल्यास भारतानें जपानकडून सोडा आयात करावा असा हट्ट जपाननें धरला होता. पण खुद्द भारतामधील सोड्याचा धंदा वाढत असल्यामुळें भारतानें हा आग्रह मानला नाहीं. सोडा आयात करण्याचेंच ठरविलें तर भारत व्यापारी पद्धतीनें कांहीं प्रमाणांत जपानकडून सोडा आयात करावयास तयार आहे, असें गेल्या वर्षी जपानला कळविण्यांत आलें होतें. चालू वर्षी भारत जपानला ३ लाख टन मीठ विकत देण्यास तयार आहे.

## ग्रामीण भागासाठी विकास योजना

राजकोट विभागांतील ४ विकासगटांत ग्रामीण भागांतील लोकसंख्येचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें ४ विकास योजना चालू करण्यांत आल्या आहेत. ह्या योजनांत मुख्यत: जमिनीची सुधारणा करण्याचें काम करण्यांत येणार आहे. प्रत्येक योजनेचें काम दोन वर्षे चालणार असून त्यासाठी प्रत्येकी २ लाख रुपये खर्च येणार आहे. विकास गटाच्या कक्षेंत येणाऱ्या भागांतील बेकार व अर्ध-बेकार ह्यांना शेतीचा हंगाम संपल्यावर काम देण्याचा योजनांचा हेतु आहे. रोजगार देण्यांत येणाऱ्या लोकांना स्थानिक दराप्रमाणें वेतन देण्यांत येईल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत खेड्यांतील बेकारी घालविण्यासाठी १५० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आलेली आहे. त्या कार्यक्रमाचाच हा एक भाग आहे.

### ब्रिटिश प्रकाशकाची दानत

भावनगर येथील एका गृहस्थांनीं गेल्या नोव्हेंबरमध्यें ब्रिटन-मधील एका प्रकाशकाकडून कांहीं पुस्तकें मागविलीं होतीं. त्यांची किंमत सुमारें ५ पौंड होती. १९६२ च्या फेब्रुआरीअखेर त्यानें पुस्तकांची वाट पाहून प्रकाशकाला पत्र लिहिलें. प्रकाशकाचें पत्र आलें कीं, पुस्तकें पाठविलीं होतीं; पण तीं वाटेंत हरवलेलीं दिसतात. तथापि तीं आतां पुन्हा पाठविलीं आहेत. भारतामधील प्रकाशक असें करतील काय ? म्हणून भावनगरच्या ग्राहकानें इच्छा केली आहे.

### एंजिनिअरिंग कारखान्यांची सहकारी संस्था

अहमदाबादच्या एंजिनिअरिंग कारखान्यांनीं आपली एक सहकारी संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. सहकारी संस्थेमार्फत सभासदांच्या गरजा पुऱ्या करण्याचा हेतु ह्यामागें आहे. प्रथम कारखान्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाचा व आयात करण्यांत येणाऱ्या मालाचा पुरवठा करण्याचें काम हातीं घेण्यांत येणार आहे.

### उद्योगधंद्यांना गॅसचा पुरवठा

भारतांत अनेक ठिकाणीं खनिज तेलाचा शोध करण्याचें काम चालू आहे. ह्या ठिकाणीं उपलब्ध होणाऱ्या गॅसचा पुरवठा उद्योगधंद्यांना करण्याची एक योजना भारत सरकारचे नॅचरल गॅस कमिशन तयार करीत आहे. हा पुरवठा करण्यासाठी नळ टाकावे लागतील. नळ टाकण्याचें काम करण्यासाठी कमिशननें परदेशी कंपन्यांशीं जारीनें वाटाघाटी चालू केल्या आहेत.

### धूम्रपान व कॅन्सर ह्यांचा संबंध आहेच

धूम्रपानाचा आरोग्यावर होणाऱ्या परिणामाविषयीं रॉयल कॉलेज ऑफ फिजिशियन्स ह्या संस्थेनें ३५,००० शब्दांचा एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्याचा निष्कर्ष असा आहे कीं, धूम्रपानामुळें फुफ्फुसाचा कॅन्सर व इतर विकार, घशाचे व हृदयाचे विकार होण्यास बराच अवसर मिळतो. १९५५ सालीं अमेरिकेंतील दोन आरोग्यविषयक संस्थांनींहि असाच निष्कर्ष काढलेला आहे.


### संयुक्त-राष्ट्र-संघटनेचे बॉन्ड्स

संयुक्त-राष्ट्र-संघटनेची आर्थिक स्थिति मजबूत करण्यासाठी आशिया खंडांतील व आफ्रिका खंडांतील राष्ट्रांनीं संघटनेचे रोखे अधिक प्रमाणांत घ्यावे असें आवाहन करण्यांत येत आहे. ह्यासंबंधीं संघटनेचा एक वरिष्ठ अधिकारी लवकरच भारत सरकारशीं वाटाघाटी करणार आहे. दिल्ली येथील संघटनेच्या कचेरीसाठी एक इमारत बांधण्याचाहि विचार करण्यांत येणार आहे. संकल्पित इमारत ६ मजली असेल आणि तींत एक मोठें सभागृह असेल. ह्या इमारतीसाठी भारत सरकार ५० लाख रुपये खर्च करणार आहे.

### गांधीधाम येथें गिरणी

गांधीधाम येथें १,२०० चात्या असलेली एक सुताची गिरणी लवकरच स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी सिंधु पुनर्वसन कॉर्पोरेशन या संघटनेनें लिमिटेड कंपनीची स्थापना केली आहे. कंपनीचें नांव गांधीधाम स्पिनिंग अँड वीव्हिंग कंपनी असें ठेवण्यांत आलें आहे. कंपनीचें एकूण भांडवल ९७ लाख रुपयांचें राहील. त्यांपैकी ३१ टक्के भांडवल कॉर्पोरेशन उभारणार आहे.


किर्लोस्कर
स्थापना १८८८
इलेक्ट्रिक पंपिंग सेट



भारतीय शेतकरी आपल्या शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठीं किर्लोस्कर पंपिंग सेटची निवड करतात. कारण ते अधिक काटकसरी, कार्यक्षम व खात्रीलायक आहेत. आपल्या कामीं योग्य आकाराच्या पंपाची निवड करून त्याचा भरपूर मोबदला मिळवा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी (द. सातारा)



## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३। „ |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ४ „ |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.